**Ref. No.** **Date :**

**( व्यावसायिक कर्जदारांसाठी )**

**प्रति,**

__________________________

__________________________

__________________________

**विषय : Resolution Framework अंतर्गत कर्जांच्या Restructuring बाबत.**

**संदर्भ : रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे परिपत्रक क्र.RBI/2020-21/16 DOR.No.BP.BC/3/21.04.048/2020-21 दि.०६/०८/२०२०.**

**महोदय,**

कोव्हिड-१९ या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे केंद्र सरकारने दि.२५ मार्च २०२० पासून सुरू असलेल्या लॉकडाऊन निर्बंधांमुळे कर्जदारांच्या उत्पन्नावर होणारा परिणाम विचारात घेऊन रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी दि.१ मार्च २०२० ते दि.३१ ऑगस्ट २०२० या सहा महिन्यांसाठी कॅश क्रेडीट कर्जांवरील व्याज भरण्यास स्थगिती (Deferment) तसेच मुदत कर्जासाठी हप्ते व व्याज भरणेसाठी विश्रांती कालावधी (Moratorium Period) देणेबाबत सूचित केलेले होते. त्यानुसार बँकेने कार्यवाही केलेली आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी कोव्हिड-१९ चा अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम विचारात घेऊन Resolution Framework अंतर्गत, कर्जखात्यांचे Restructuring करणेबाबतचा पर्याय उपलब्ध करून दिलेला आहे. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार Resolution Framework अंतर्गत कर्जखात्यांचे Restructuring करण्याबाबतचे धोरण बँकेने तयार केले आहे. **कोव्हिड-१९ मुळे आपल्या उत्पन्नावर विपरीत परिणाम झाला असेल आणि त्याबाबतचा कागदोपत्री तपशील उपलब्ध असेल तरच आपणांस सदर पर्यायाचा अवलंब करता येईल.** सदरची प्राथमिक पात्रता पूर्ण होत असल्यास, खालील निकष व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर तसेच, रिझर्व्ह बँकेने दिलेल्या आर्थिक रेशोंची पूर्तता होत असल्यास आपल्या कर्जखात्यांचे Restructuring बाबतचा अंतीम निर्णय बँक घेईल व तो आपल्यावर बंधनकारक असेल.

- Resolution Framework अंतर्गत कर्जखात्यांचे Restructuring साठी कर्जदार, सहकर्जदार व जामीनदार यांच्या सहीनिशी अर्ज.
- Resolution Framework अंतर्गत कर्जखात्यांचे Restructuring प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आपली कर्जखाती नियमित (Standard) असणे आवश्यक आहे.
- आर्थिक वर्ष २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० साठीचे ताळेबंद, नफा-तोटा पत्रके व आयकर विवरणपत्रके.
- माहे जानेवारी २०२० पासून दरमहाची अद्ययावत खरेदी व विक्री याचा तपशील.
- कर्ज परतफेड पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीपर्यंतचा प्रकल्प अहवाल व त्यामध्ये गृहीत धरलेल्या बाबींचा तपशील.

..२..

- कोव्हिड-१९ मुळे व्यवसाय व उत्पन्नावर काय, कसा, किती परिणाम झाला? याचा सविस्तर तपशील.
- व्यवसाय व उत्पन्नावर झालेला परिणाम सौम्य, मध्यम अथवा तीव्र असल्याची माहिती.
- व्यवसाय व उत्पन्न यामध्ये सुधारणा, वाढ होणेसाठी काय उपाययोजना केली आहे, यापुढे काय करणार आहे, याची माहिती.
- व्यवसाय व उत्पन्न कोव्हिड-१९ च्या आधीच्या पातळीवर (पूर्ववत) कधी होईल, याची सविस्तर माहिती.
- अपेक्षित विश्रांती कालावधी (जास्तीत जास्त २ वर्षे), कर्ज परतफेडीसाठी अपेक्षित कालावधी (जास्तीत जास्त १० वर्षे विश्रांती कालावधीसह), कर्ज परतफेडीसाठी हप्ता पध्दत.

वरील कागदपत्रांची पूर्तता करून आपला कर्जखात्यांचे Restructuring साठीचा प्रस्ताव शाखेस **दि.३० नोव्हेंबर २०२० पूर्वी** सादर करावा. तद्नंतर आलेल्या प्रस्तावाचा विचार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

याबाबत आपणांस काही शंका/मार्गदर्शन हवे असल्यास शाखाव्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा, ही विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित,

**( सीए. दिलीप गुरव )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**कर्जदाराची सही :** ____________________